# मकर संक्राती विशेष

मकर संक्रांतीच्या दिवशी प्रत्येक वर्षी लाखो श्रध्दाकुंचा मेळा विविध नद्यांच्या घाटावर लागतो. या दिवशी लोक नविन कपडे वगैरे परिधान करुन नव्या वस्तू विकत घेतात. तीळ गुळ वाटून आपआपसात आनंद व्यक्त करतात. या सर्व स्थूल परंपरांच्या मागे काही रहस्य लपलेले आहेत. त्यांना जाणून घेवून संक्रात सण साजरा करणे सार्थक होईल.

आता या कलियुगाचा अंतिम समय चालू आहे, ज्यात पाप, अत्याचार, धार्मिक हिंसा, अनैतिक राजनिती इ. विकृत्या होत आहेत. सर्व मानवता ही दुःख, अशांती आणि तणावाने पछाडलेली आहेत. बहुतेक लोक हे परिवर्तनाच्या प्रतिक्षेत आहेत व आपल्याला हे जाणून आनंद होईल की आता या सृष्टिचा परिवर्तनाचा काळ जवळ आला आहे. ज्या प्रमाणे व्यक्ति आपले कपडे बदलतो. साप आपली कात टाकतो, पानझडी नंतर वृक्ष हिरवे गार होतात. त्याच प्रकारे हा वर्तमान काळ सृष्टि संक्रमणाच्या काळापासून चालला आहे. जेव्हा की सर्व व्यवस्था आणि मनुष्याची मनोदशा ही जीर्ण क्षीण झाली आहे. अशा समयी परमात्मा शिव कलीयुगी आणि सतयुगाच्या संधिकाळात म्हणजेच संगमयुगात फार काळ प्रवेश करुन ब्रह्माच्या शरीरात आले आहेत, व ते सत्य गीता ज्ञानाची गंगा वाहत आहेत.

**खरा संगत -** असे तर संक्रातिल लोक नदीच्या संगमावर आंघोळ करतात. व मेळा अरवतात, परंतु आता कलयुगाचा अंत आणि सतयुगाचा आदिचा पुण्य प्रदायक पुरुषोत्तम संगमयुग चालू आहे, भक्तिमार्गात ज्या प्रमाणे पुरुषोत्तम महिन्यात दान पुण्य, स्नान इत्यादींचे महत्व असते. त्याचप्रमाणे आता दोन युगांच्या मधला खरा संगम म्हणजेच पुरुषोत्तम संगमयुग चालू आहे. ज्यामध्ये ज्ञान स्नान, करुन विकारांचे दान करुन पूण्य कर्माचे बीज उघडणारी प्रत्ये आत्मा पुरुषापासून उत्तम पुरुष बनू शकते. दुसऱ्या शब्दात हा मानवाच्या दिव्यीकरणाचे युग आहे, आता या ज्ञान मानसरोवरात परमात्मा गीता ज्ञानाद्वारे मनुष्यांचे काया कल्प करत आहेत.

लोक विशेष करुन संक्रांतीवर विशेष तीळ व गुळ वाटतात. खिचडी वाटतात. दान करतात याचा अर्थ असा की मनुष्याच्या संस्कारात असुरतेची मिळावट झाली आहे. म्हणजेच त्याचे संस्कार खीचडी बनले आहे.

ज्यांना परिवर्तीत करुन दिव्य आणि श्रेष्ठ संस्कारांना धारण करायचे आहे. याचा दुसरा अर्थ असाही होतो की, प्रत्येक मनुष्याला वैर, इर्षा, द्वेष इत्यादी सोडून संस्काराचे मिलन असे करावे की ज्या प्रकारे खिचडी मिळते, सोबतच या धर्मग्लानीच्या वेळी परमात्माची ही आज्ञा आहे की आपण तिळा प्रमाणे आल्या सुक्ष्म-सुक्ष्म विकारांना तिलांजली द्यायची आहे. म्हणजेच संपूर्ण पवित्र बनायचे आहे तेव्हाच आपण देवत्वाला प्राप्त करु शकू.

**आत्मा आणि परमात्म्याचे मिलन -** मनुष्य गायन करतात की, आत्मा परमात्मा अलग रहे बहुकाल सुंदर मेला तब लगे जब सद्गुरु मिले दलाल. म्हणजेच या वर्तमान समयी शिव परमात्मा प्रजापिता ब्रह्मा च्या माध्यमाने या संसाराच्या सर्व आत्म्यांशी मिलन मनवत आहेत आणि सतगुरुच्या रुपात ज्ञान देवून त्यांची सद्गति करत आहेत.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com